بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡم     نَحۡمَدُہٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡم     وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡد

لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA



Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in     محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)


# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे पवित्र कुरआन ची प्रतिष्ठा, स्थान, दर्जा आणि महानतेचे वर्णन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १० फेब्रुवारी २०२३,

أَشۡهَدُ أَنۡ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِيۡكَ لَهٗ وَأَشۡهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبۡدُهٗ وَرَسُوۡلُهٗ أَمَّا بَعۡدُ فَأَعُوۡذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيۡطٰنِ الرَّجِيۡمِ۔

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ اَلۡحَمۡدُ لِلّٰهِ رَبِّ الۡعٰلَمِيۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ مٰلِكِ يَوۡمِ الدِّيۡنِ۔ اِيَّاكَ نَعۡبُدُ وَاِيَّاكَ نَسۡتَعِيۡنُ۔ اِهۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِيۡمَ۔ صِرَاطَ الَّذِيۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَيۡهِمۡ ۙ غَيۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَيۡهِمۡ وَلَا الضَّآلِّيۡنَ۔

تشہد، تعوذ اور سورۃ الفاتحہ کی تلاوت کے بعد حضورِ انور ایدہ اللہ تعالیٰ بنصرہ العزیز نے فرمایا :

मागच्या प्रवचनात, मी पवित्र कुरआन चे महत्त्व आणि महानतेबद्दल अपेक्षित मसीह व महदी यांनी सांगितलेल्या उपदेशांना प्रस्तूत करत होतो, आज देखील त्याच संदर्भात काहीं प्रस्तूत करेन.

हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) इस्लामच्या प्रचारांतर्गत राणी व्हिक्टोरियाच्या हिरक महोत्सवानिमित्त राणीला लिहिलेल्या पुस्तिका 'तोहफा ए कैसरियाः' मध्ये पवित्र कुरआनचे गुण आणि महत्त्वबद्दल सांगतात की, पवित्र कुरआन प्रगल्भ आणि खोल विवेकयुक्त शिकवणूकीने भरलेला आहे. आणि त्यातील प्रत्येक शिकवण 'बायबल'पेक्षा अधिक खऱ्याखुऱ्या सदाचरणावर आधारित आहे. विशेषतः खरा आणि अपरिवर्तनीय परमेश्वर दाखवण्याचा साधन कुरआनच आहे. जर तो (पवित्र कुरआन) जगात आला नसता तर जगातील सृष्टीवादाचा आकडा कितीवर पोहोचला असता हे परमेश्वरच जाणतो. परमेश्वराचे आभार आहे की पृथ्वीवरून हरवलेली एकेश्वरवादाची देणगी त्याने कुरआनच्या हस्ते पुन्हा स्थापित केली.

हुज़ूर अनवर म्हणाले, ''त्या युगात कोण होता ज्याने भारताच्या महाराणीला एवढ्या धैर्याने हा संदेश पाठवला आणि इस्लामचा प्रचार केला?'' हेच लोक, ज्यांना इस्लाम आणि पवित्र कुरआनची महानता सांगण्याचे धाडस नव्हते, आज म्हणतात की हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) आणि अहमदिया जमाअत पवित्र कुरआनचा अपमान करत आहे, याउलट पवित्र कुरआनची महानता नाकारू न शकणारे गैर-मुस्लिम त्यांचे कृत्ये पाहून इस्लामच्या विरोधात इतके आंधळे झाले आहेत की आपल्या संतुष्टीसाठी ते पवित्र कुरआनाच्या प्रती जाळतात आणि आपला राग काढतात. अशा घटना स्वीडन आणि स्कॅन्डिनेव्हियन देशांमध्ये घडल्या आहेत. जर मुसलमानांनी युगावतराचा स्वीकार करून आणि पवित्र कुरआन च्या शिकवणीला समजून त्यावर काटेकोरपणे अंमलजबजावणी केली, तर बिगर मुसलमानांना असे अपमानजनक गोष्टी करण्याचे धाडस कधीच होणार नाही. अल्लाह या लोकांना सद्‌बुद्धी देवो.

केवळ पवित्र कुरआन आता मार्गदर्शनाचा स्त्रोत आहे. या संदर्भात हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की, इस्लाम हा इतका आशीर्वादित आणि ईश्वरयुक्त धर्म आहे की जो

व्यक्ती खरोखरच परमेश्वराच्या पवित्र वचनाच्या शिकवणीचे पालन करेल, त्याला निश्चितपणे याच जगात परमेश्वर पहायला मिळेल. तो परमेश्वर, जो ऐहिक दृष्टयाच्या पड्यापासून दूर आहे तो केवळ कुरआनच्या शिकवणीद्वारे प्राप्त होऊ शकतो. त्यात एक आशीर्वाद आणि आकर्षण आहे जे ईश्वराच्या साधकाला ईश्वराकडे आकर्षित करते आणि प्रकाश, शांती आणि समाधान देते. पवित्र कुरआनमध्ये खरा विश्वास ठेवणारा केवळ तत्त्ववेत्त्यांसारखा विचार करत नाही की या विवेकपूर्ण आणि अबाधित जगाचा निर्माता कोणी असावा तर तो वैयक्तिक अंतर्दृष्टी प्राप्त करून आणि विश्वासाने समृद्ध डोळ्याने पाहतो की प्रत्यक्षात तो निर्माता आहे. आणि ज्याला या पवित्र शब्दाचा प्रकाश मिळतो तो कोरड्या तर्कांप्रमाणे परमेश्वर हा एकम् अद्वियतम् आहे असे समजत नाही तर त्याला हाताशी धरून अंधारातून बाहेर काढणाऱ्या चिन्हांच्या सहाय्याने तो खऱ्या अर्थाने हे पाहतो की प्रत्यक्षात आणि गुणांधर्मांत परमेश्वराचा कोणीही भागीदार नाही आणि इतकेच नाही तर तो प्रत्यक्ष जगाला दाखवतो की तो त्याला असा समजतो आणि एकत्वाची महानता त्याच्या अंतःकरणात इतकी गढून गेलेली असते की तो संपूर्ण जगाला मृतक किडा समजतो किंबहुना एक निरर्थक आणि पोकळ मानतो.

परत पवित्र कुरआनातील शैक्षणिक आणि व्यावहारिक पूर्ततेच्या सूचनांबाबत, अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) सांगतात की, पवित्र कुरआनमध्ये शैक्षणिक आणि व्यावहारिक पूर्ततेसाठी निर्देश आहेत, हे देखील लक्षात ठेवले पाहिजे. اِهۡدِنَا الصِّرَاطَ मध्ये, शैक्षणिक पूर्णतेचा संदर्भ आहे, आणि صِرَاطَ الَّذِیۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَیۡہِمۡ मध्ये व्यावहारिक दृष्टया असे सांगितले गेले आहे की याद्वारे परिपूर्ण आणि अंतिम परिणाम प्राप्त होतील. व्यवहारिक प्रगती साठी त्यालोकांचे मार्गक्रमण करणे आवश्यक आहे, जे बक्षीसप्राप्त कर्ता आहेत अर्थात- नबी, सिद्दीक, शहीद आणि सदाचारी लोक आणि त्यांची उदाहरणे आहेत. या युगातही असे लोक आहेत जे मार्गदर्शन करतात आणि ज्यांना अल्लाह बक्षीस प्रदान करतो. ते म्हणाले,''ज्याप्रमाणे लागवड केलेल्या रोपाची पूर्ण वाढ होत नाही तोपर्यंत ती फुलू शकत नाही, त्याचप्रमाणे, जर एखाद्या मार्गदर्शनाचे सर्वोच्च आणि परिपूर्ण परिणाम होत नाही तोपर्यंत ते पोकळ मार्गदर्शन आहे.'' पवित्र कुरआन तो मार्गदर्शक आहे, ज्याचा अनुयायी उच्च स्तरावर परिपूर्णता प्राप्त करतो आणि परमेश्वरासोबत त्याचा एक अतूट संबंध प्रस्थापित होतो इतके की त्याचे वर्तन एका फलदायी झाडासारखे वाढत आणि फूलत जातात.

पवित्र कुरआन हा एक पवित्र ग्रंथ आहे जो त्या काळात जगात आला, जेव्हा तेथे खूप उपद्रव माजला होता आणि अनेक वाईट श्रद्धा आणि वाईट कृत्ये प्रचलित होत्या. त्यांच्याबद्दल सर्वशक्तिमान अल्लाह पवित्र कुरआनमध्ये सूचित करतो की, ظَهَرَ الۡفَسَادُ فِی الۡبَرِّ وَالۡبَحۡرِ म्हणजे, सर्व लोक, मग ते ग्रंथधारक असोत किंवा इतर, सर्व चूकीच्या विश्वासाने ग्रस्त होते आणि त्यांच्यात एक मोठी अराजकता निर्माण होती. म्हणूनच सर्वशक्तिमान अल्लाहने सर्व खोट्या समजुतींचे खंडन करण्यासाठी पवित्र कुरआन अवतरित केले. विशेषतः सूरह अल-फातिहा, जी पाच वेळेच्या नमाज च्या प्रत्येक रकातमध्ये पठन केली जाते, त्याद्वारे संक्षिप्त रूपात तमाम विधी-विधानांना नमूद करण्यात आले. जसे की फरमाविले, الحمد لله رب العالمين अर्थात सर्व स्तूती चा अधिकारी अल्लाह हाच आहे जो सर्व जगांचा विधाता आहे. الرحمن तो कृतींशिवाय निर्माण करतो आणि कोणत्याही

कृतीशिवाय प्रदानही करतो. الرحيم तुम्ही जे काही करता त्याचे बक्षीस प्रदान करतो आणि प्रार्थना केल्यावर तो कबूलही करतो. तो مالكِ يوم الدِين आहे अर्थात निवाड्याच्या दिवसाचा अधिपति. आणि प्रत्येक कृतीबद्दल तो एकमेव बक्षीस किंवा शिक्षा देतो. ते म्हणाले की, या चार गुणवैशिष्ट्यांमध्ये जगातील सर्व धर्मांचा वर्णन केलेला आहे. आता जर एखाद्या व्यक्तीने या प्रार्थनेला पाच वेळा नमाज मध्ये पठण केले तर त्याला निश्चितच मोठे ज्ञान प्राप्त होऊ शकते.

हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की, पवित्र कुरआन एक चमत्कार आहे. चमत्कार ही अशी अलौकिक शक्ती आहे की विरोधी पक्ष त्याच्या विरोधात उदाहरण सादर करू शकत नाही. पवित्र कुरआनचा चमत्कार अरबस्तान देशातील सर्व रहिवाशांना सादर करण्यात आला होता, परंतु अरबस्तानातील सर्व रहिवासी ते सादर करू शकले नाहीत. म्हणून चमत्काराची संज्ञा समजून घेण्यासाठी पवित्र कुरआनाची रचना, एक अतिशय तेजस्वी उदाहरण आहे. त्याची रचना अतिशय समृद्ध आणि वैपुल्य आहे. हा एक असा दिव्य चमत्कार आहे ज्याच्याविरूद्ध तेराशे वर्षे उलटून गेल्यानंतरही कोणीही उभा करू शकला नाही. हा ग्रंथ चमत्कारिक भविष्यवाण्यांना अनन्यसाधारण आणि अलौकिक वाक्यरचनात प्रदर्शित करतो. चमत्काराचे खरे आणि महत्त्वपूर्ण उद्देश सत्य आणि असत्य यांच्यातील फरक स्पष्ट करणे अथवा सच्च्या आणि खोटारड्यातील भेद दाखवून देणे हे आहे. धर्माचे खरे रहस्य सर्वशक्तिमान ईश्वरची ओळख करून देण्याशी संबंधित आहे. एखाद्या खऱ्या आणि सत्यनिष्ट धर्मासाठी, हे आवश्यक आहे की त्याच्यात असे चिन्हे व खुणे असायला हवे जे सर्वशक्मिान ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल स्पष्ट आणि ठळक प्रमाण देते.

हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणाले की, जो धर्म परमेश्वराचे अस्तित्व ओळखण्यापासून परावृत्त आहे तो एक मृत धर्म आहे ज्यातून कोणीही शुद्ध बदल मिळवू शकत नाही. पुढे ते म्हणाले की, मग त्या ग्रंथात लिहिलेल्या तर्कशुद्ध गोष्टी प्रत्यक्षात ईशवाणी आहेत हे कोणी ठरवायचे. ते ईश्वर अस्तित्वाबद्दल युक्तिवाद कधी प्रदान करू शकते आणि एका सत्यशोधकाला समाधान देऊ शकते की या तर्कशुद्ध गोष्टया सार्थक परमेश्वराचे वचन आहेत आणि त्याला ठामपणे विश्वास असेल की हे सर्व त्रुटीमुक्त आणि दुरुस्त आहेत. म्हणून जर धर्म आपल्या सत्यप्रमाणतेचे कारण केवळ काहीं तर्कवितर्क किंवा तत्त्वज्ञानाला घोषित करत असेल आणि आकाशीय चिन्हांना आणि अलौकिक बाबींना प्रस्तूत करण्यापासून लाचार असेल, तर असा धर्माचा अनुयायी भ्रमात आहे आणि तो अंधारात वावरत मरून जाईल. परमेश्वराचे अस्तित्व निर्णायकपणे सिद्ध करण्यासाठी जबाबदार असल्याशिवाय धर्म निरर्थक आणि अर्थशून्य मानले जाईल.

हुजूर अनवर म्हणाले की, हा दर्जा आणि स्थान प्राप्त करण्याकरित आम्हाला नेहमी प्रयत्नशील रहायला हवे. परमेश्वराला चिन्हांद्वारे आणि वयैक्तिकसंबंधाद्वारे ओळखा. तेव्हाच अल्लाहची हकीगत जाहीर होते. परमेश्वराच्या कृपेने अहमदिया मुस्लिम जमाअत मध्ये असे अतोनात उदाहरण पहावयास मिळतात ज्यामध्ये बिगर मुसलमान आणि नास्तिक देखील परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल विश्वासी झालेत. तर्कशुद्ध युक्तिवाद दिल्या गेल्या आणि मग जेव्हा चिन्हे दाखवण्यात आले आणि प्रसंगवर्णन करण्यात आले, तेव्हा त्यांनी तो कबूलही केले आणि अहमदिया मुस्लिम जमाअत मध्ये सामीलही झाले. बेल्जियममधील एका मित्राने, जे पहिले नास्तिक होते, यांनी दिक्षा घेतल्यानंतर सांगितले की, जेव्हा सर्वकाही समजून मी ईश्वराचे अस्तित्व स्वीकारले, तेव्हा माझ्यापुढे अहमदियत अर्थात खरा इस्लाम स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता आणि हा मार्ग मला

अहमदियाने दाखवला, म्हणून मी अहमदी मुसलमान झालो. काय करंटी आहेत आमचे विरोधी जे ज्ञानाचे शब्द ऐकू इच्छित नाहीत आणि उलट आमच्यावर पवित्र कुरआनचा विपर्यास केल्याचा आरोप करतात.

अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की, पवित्र कुरआनने प्रत्येक कथा पवित्र प्रेषित (अ.स.) आणि इस्लामसाठी एक भविष्यवाणी म्हणून घोषित केली आहे आणि या कथांच्या भविष्यवाण्या देखील उत्तम प्रकारे पूर्ण झाल्या आहेत. म्हणून हे लक्षात ठेवायला हवे की, पवित्र कुरआन ही ज्ञानाची आणि तथ्यांची नदी आणि भविष्यवाण्यांचा समुद्र आहे. पवित्र कुरआनशिवाय कोणीही सर्वशक्तिमान अल्लाहवर विश्वास ठेवू शकत नाही आणि हे वैशिष्ट्य विशेषतः पवित्र कुरआनमध्येच आहे. याद्वारे परमेश्वर आणि मनुष्य यांच्यातील उभे असलेले पडदे दूर होऊन जातात. पवित्र कुरआनचे दोन भाग आहेत. एक कथा आणि दुसरा आज्ञा. काहीं गोष्टी कथेच्या रंगात तर काही आज्ञा सूचनांच्या रंगात असतात. जे यात फरक करत नाहीत तेच पवित्र कुरआनमधील मतभेद सिद्ध करतात.

हा विषय पुढेही चालू राहील आणि हजरत अपेक्षित मसीह यांचे यासंदर्भात असलेले उपदेश वेळोवेळी प्रस्तूत करेन. अल्लाह तआला आम्हाला पवित्र कुरआनच्या शिकवणींचे अचूक पालन करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ
عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِى الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ
لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ۔